# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिका क्षेत्रातील अनेक उर्दू शाळांची झालेली दुरवस्था**

**(१) २६४३ (२२-१२-२०१४). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिका क्षेत्रातील अल्पसंख्यांकांच्या उन्नतीसाठी असलेल्या अनेक उर्दू शाळांची मोठ्या प्रमाणात दूरवस्था झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांची वा शिक्षण संस्थांची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळांची दूरवस्था दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०५-२०१६) :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) शाळांची दूरवस्था झालेली नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महाविद्‌यालयीन प्राध्यापकांना त्यांनी केलेल्या असहकार आंदोलनाच्या कालावधीतील वेतन मिळण्याबाबत**

**(२) १५०२७ (०९-०४-२०१५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेच्या आदेशानुसार दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ ते १० मे, २०१३ या कालावधीत महाराष्ट्रातील महाविद्‌यालयीन प्राध्यापकांचे परीक्षेसंबंधात कामावर असहकार आंदोलन सुरु होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनाच्या कालावधीत महाविद्यालयीन प्राध्यापकांनी अध्यापनाचे काम पूर्ण केले आहे काय, तसेच दैनिक हजेरी पत्रकावर सही केलेली आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १० मे, २०१३ रोजी परिक्षेच्या कामाकाजावरील आंदोलन मागे घेतल्यानंतर परीक्षेसंबंधीचे काम महाविद्यालयीन प्राध्यापकांनी पूर्ण केले होते व दिनांक १० मे, २०१३ नंतर सर्व परिक्षेसंबंधिची कामे महाविद्यालयीन प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबाबतचे पत्र महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयीन कुलगुरुंनी शासनाला पाठविले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त कालावधीतील वेतन अद्याप संबंधित प्राध्यापकांना न देण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त कालावधीत वेतन सबंधित महाविद्यालयीन प्राध्यापकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्यानुषंगाने उपरोक्त प्राध्यापकांना उक्त कालावधीतील वेतन केंव्हापर्यंत मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-०५-२०१६) :**(१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) नाही.
(४) व (५) अकृषि विद्यापीठीय शिक्षक व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांच्या परिक्षेच्या कामकाजावरील बहिष्काराबाबत शासनाने शासन परिपत्रक दि. ६.०३.२०१३ अन्वये बहिष्कारात भाग घेतलेल्या अध्यापकांना "काम नाही वेतन नाही" या तत्वानुसार वेतन अदा करण्यात येऊ नये असा निर्णय घेतला आहे. त्याविरोधात एम.फुक्टो. या शिक्षक संघटनेने परीक्षेच्या कामकाजावर घातलेल्या बहिष्काराविरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.१३२६/१२ दाखल केली होती. त्यामधील मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १० मे, २०१३ च्या आदेशानुसार तक्रार निवारण समिती दि.२५.०७.१३ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या दोन बैठका घेण्यात आल्या. उक्त कालावधीतील वेतन देणेबाबतचा निर्णय अद्यापही घेण्यात आलेला नाही. आता उक्त समितीची पुनर्रचना करुन दि.०४.०२.२०१३ ते दि.१०.०५.२०१३ या कालावधीत परीक्षेच्या बहिष्कारात सहभागी झालेल्या शिक्षकांचे या कालावधीत वेतन बंद करण्याबाबत घेतलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शिक्षक संवर्ग व संघटनांची भूमिका ऐकूण घेऊन निर्णय घेण्यासाठी दि.१०.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरावर समिती गठित करण्यात आलेली आहे.

---

**राज्यात जीवनावश्यक वस्तूंचे, भाजीपाला, डाळी आणि कडधान्यांचे**
**दर स्थिर ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत**

**(३) २४४२५ (३१-०७-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात भाजीपाला, डाळी आणि कडधान्यांचे दर दिवसेंदिवस वाढत असून तूर रु. १२० किलो, मूग रु. १२८, उडीद रु.१२८, चणाडाळ, मसूर, मटकी, चवळी यांचे दर तब्बल २० ते ३०

रुपयांनी वाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना महागाईची झळ बसत असल्याचे माहे जून २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जीवनावश्यक वस्तूंचे, भाजीपाला, डाळी व कडधान्यांचे दर स्थिर ठेवण्यासाठी व सर्वसामान्यांना महागाईचे झळ पोहचू नये याकरीता कोणती उपाययोजना शासनाने आखली आहे वा त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) शासनाने डाळी व खाद्यतेल यांवर साठामर्यादा लागू केलेली आहे. त्या अनुषंगाने जीवनावश्यक वस्तुंच्या साठेबाजीस आळा बसावा या दृष्टीकोनातून धाडी/ तपासण्या करण्याच्या सूचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आलेल्या आहेत.

तूर/तूरडाळ, खाद्यतेल, खाद्यतेल बिया व इतर कडधान्य यांच्या किंमती नियंत्रीत ठेवण्याच्या अनुषंगाने उपाययोजना करण्यासाठी दिनांक २८.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दर नियंत्रक समिती गठीत करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे डाळीचे दर नियंत्रीत ठेवण्यासाठी दर नियंत्रक कायद्याच्या प्रारुपास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली असून सदर कायद्याच्या प्रारुपास विधी व न्याय विभागामार्फत केंद्र शासनाची मान्यता प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात होत असलेली गुटखा विक्री

**(४) २८२३० (१५-१०-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असली तरीही छुप्या पध्दतीने गुटख्याची खरेदी-विक्री जोरात सुरु असून उत्पादकांचे नाव व पत्ते कळू नये यासाठी गुटख्याच्या पाकीटावर इम्पोर्टेड फ्रॉम बांग्लादेश, नेपाळ असे लिहिण्यात येत असल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील जालना शहराजवळ दोन ठिकाणी छापे टाकून बदनापूर पोलीसांनी रूपये १ कोटी ८० लाख किंमतीचा विविध कंपन्यांचा गुटखा जप्त केला असल्याचे दिनांक २८ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात बिहार, गुजरातसह सिल्वासा, दीव-दमण येथूनही गुटखा येत असून माहे जुलै २०१५ च्या शेवटच्या आठवडयात अन्न व औषध प्रशासनाने ठाणे जिल्हयात मोठया प्रमाणात गुटखा पान मसाला पकडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात गुटखाबंदी असतानासुध्दा अवैध मार्गाने गुटखा विक्री मोठया प्रमाणात सुरु असून गुटख्यामुळे विविध गंभीर आजार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-०४-२०१६) :**(१) हे खरे नाही.

तथापि, काही गुटख्यांच्या पाकीटावर उत्पादकांचा पत्ता म्हणून नेपाळ, यु.ए.ई.या देशांचा उल्लेख केला असल्याचे आढळून आले आहे.

(२) हे खरे आहे.

तथापि, सदर कारवाई ही दिनांक २८ मार्च, २०१५ रोजी घेतली नसून, दि.२५/०८/२०१५ व २७/८/२०१५ रोजी अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस विभाग जालना यांनी संयुक्तपणे कारवाई करुन रु.१,०१,७७,७९२/- किमतीचा विविध कंपन्यांचा गुटखा व तत्सम अन्नपदार्थांचा बदनापूर येथून जप्त केला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

काही/गुटखा पानमसालाच्या पाकीटांवर उत्पादकांचा पत्ता हा अहमदाबाद, बरोडा असा उल्लेख केला असल्याचे आढळून आले आहे.

(४) राज्यात गुटखा विक्री छुप्या पध्दतीने तुरळक प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले असून, गुटख्यामुळे विविध गंभीर आजार होतात हे निष्पन्न झाल्यामुळेच त्यावर सन २०१२ पासून राज्यात प्रतिबंध घातला आहे.

(५) दि.१५/७/२०१५ रोजी अधिसूचनेद्वारे राज्यात गुटखा, पानमसाला, सुगंधित/स्वादिष्ट तंबाखू, सुगंधित/स्वादिष्ट सुपारी, अपमिश्रकेयुक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू इत्यादींवर प्रतिबंध घालण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबत

**(५) २८६७५ (२३-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केला असून मराठी भाषेचा इतिहास दीड ते दोन हजार वर्षांपुर्वीचा असल्याचे पुरावे सादर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक भाषेचा वारसा जतन करुन अधिक प्रगल्भ व्हावा याकरिता मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याच्या राज्यातील जनतेच्या मागणीकडे सतत दुर्लक्ष होत आहे, हे ही, खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी शासनाकडून कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत वा येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मद्रास येथे प्रलंबित असलेल्या विविध रीट याचिकेवर होणा-या निर्णयानंतर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे केंद्र शासनाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्‌यार्थ्यांच्या शालेय पोषण आहाराच्या निधीत वाढ करण्याबाबत

**(६) २८७६६ (२१-०१-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्‌यार्थ्यांसाठी सन २०१५-२०१६ या शालेय वर्षासाठी शालेय पोषण आहारात केवळ ५ टक्के वाढ करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्याची महागाई विचारात घेऊन शालेय पोषण आहाराच्या निधीत करण्यात आलेली वाढ ही अतिअल्प असल्याने त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२९-०४-२०१६) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या दि.२८/०७/२०१५ च्या निर्देशानुसार राज्य शासनाने शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्याच्या दरात दि.१२/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये ५% वाढ केली आहे. तथापि, केंद्र शासनाने यामध्ये बदल करुन दि.१/१/२०१६ च्या पत्रान्वये सदर वाढ ७.५% पर्यंत करण्याचे निर्देश दिलेले होते. त्यानुषंगाने शासनाने दि.०९/०३/२०१६ च्या शासन निर्णयान्वये याबाबत सुधारणा करुन सन २०१५-१६ साठी अन्न शिजविण्याच्या दरात ७.५% वाढ केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठाचे उपकेंद्र सुरू करण्याबाबत**

**(७) २८७८३ (२३-१२-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ अमरावतीचे उपकेंद्र सूरू करणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ जून २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापिठाच्या परिक्षेत्रात प्रत्येक जिल्ह्यात उपकेंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सन १९९७ मध्ये सादर केला होता व त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्याचा समावेश होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त विद्यापिठाचे उपकेंद्र बुलढाणा येथे कार्यान्वित करणे बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०४-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) तत्कालीन शासनाने जागेची उपलब्धता तपासून अकोला किंवा वाशिम येथे उपकेंद्र सुरु करण्याबाबत दिलेल्या सूचनेनुसार संत गाडगेबाबत अमरावती विद्यापीठाने वाशिम येथे उपकेंद्र सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव सन २०१० मध्ये शासनास सादर केला आहे.

(४) राज्यातील अकृषी विद्यापीठांतर्गत उपकेंद्र स्थापन करण्यासंदर्भात निश्चित धोरण ठरविण्याकरता उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि.२८.०४.२०१५ अन्वये नियुक्त केलेल समितीने आपला अहवाल नुकताच शासनास सादर केला आहे. सदरहू अहवालावर शासनस्तरावर योग्य तो निर्णय झाल्यानंतर त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, महापालिका शाळांमध्ये क्रीडा साहित्य नसलेबाबत**

**(८) २९०४७ (२२-१२-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरांसह ग्रामीण भागातील शाळांतून क्रीडाविषयक पायाभूत सोयी-सुविधा निर्माण व्हाव्यात, खेळाडूंना अद्ययावत क्रीडा साहित्य मिळावे यासाठी शासनाने क्रीडा धोरणांमध्ये विशेष निधीची तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनेक प्रकारच्या जाचक अटींची पूर्तता शाळांना करता येत नसल्याने अनेक शाळांना क्रीडा साहित्यच मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक शाळांना अनुदान नसल्याने विद्यार्थ्यांना खेळांपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) क्रीडा धोरण २०१२ नुसार जिल्हा वार्षिक योजनेच्या क्रीडांगण विकास अनुदान योजनेतून सर्व मान्यताप्राप्त अनुदानीत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना रु.३.०० लाखापर्यंत क्रीडा साहित्य पुरविण्याची तरतूद केलेली आहे. तथापि, या योजने अंतर्गत फक्त एका ग्रामपंचायत शाळेकडून शुटींग या खेळाचे साहीत्य मागणीचा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी, कोल्हापूर कार्यालयाकडे प्राप्त झालेला होता. त्याप्रमाणे त्यांना साहीत्य पुरवठा करण्यात आलेले आहे. या योजनेंतर्गत संबंधित पात्र शाळांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शासन निर्णय दिनांक १३.०२.२०१४ नुसार क्रीडांगण विकास अनुदान योजनेतून क्रीडा साहित्य पुरवठा करण्यासाठी सादर करावयाच्या प्रस्तावासोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या अटीबाबत अथवा त्याच्या शिथीलतेबाबत कोणत्याही शाळा/संस्थेने विचारणा/मागणी केलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील ग्रामीण व शहरामधील कुटुंबांसाठी वैयक्तिक शौचालयांची उभारणी करण्याबाबत

**(९) २९६५२ (१६-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात ५६ लाख तर शहरामध्ये ८ लाख कुटुंबांना वैयक्तिक शौचालयाची गरज असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मोठयाप्रमाणात शौचालयांची उभारणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०४-२०१६) :**(१) सन २०१२मध्ये केलेल्या पायाभूत सर्वेक्षणानुसार राज्याच्या ग्रामीण भागातील १,२५,२४,७९७ कुटुंबांपैकी ६४,९२,४०६ कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नव्हती. यापैकी, माहे, ऑगस्ट, २०१५ पर्यंत ५०,७३,९६४ कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नव्हती.

तसेच, सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची नागरी लोकसंख्या ही ५,०८,२७,५३१ एवढी होती. यापैकी, माहे, ऑगस्ट, २०१५ पर्यंत २९% म्हणजेच १,४७,३९,९८३ कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नव्हती.

(२) व (३) दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून लागू करण्यात आलेल्या स्वच्छ भारत मिशन - नागरी व ग्रामीण या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमाच्या माध्यमातून देशाच्या शहरी व ग्रामीण भागात मोठ्याप्रमाणात वैयक्तिक शौचालयांची उभारणी करुन दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत राज्य हागणदारीमुक्त करण्याचे नियोजन आहे.

---

**श्रीरामपूर (ता.जि.अहमदनगर) येथील टाकळीभान येथे क्रीडा संकुलन उभारण्याबाबत**

**(१०) २९७५७ (२२-१२-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (ता.जि.अहमदनगर) येथील टाकळीभान येथे अनेक होतकरु कबड्डी खेळाडू असून त्यांना खेळण्याकरिता आवश्यक क्रिडा संकुल नसल्याचे त्यांची गैरसोय होत असून, क्रिडा संकुलाकरिता आवश्यक जागा देण्यात आल्यास टाकळीभान येथे तालुका क्रिडा संकुलाच्या उभारणीकरीता आवश्यक सहकार्य करु असे आश्वासन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग १ लक्षात घेता आवश्यक कार्यवाही अद्यापही न झाल्याने क्रिडापट्टूची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन याबाबत लक्ष घालून आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) टाकळीभान येथे तालुका/ग्राम क्रीडा संकुलासाठी जागा निकश्चत करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींशी दिनांक १५.०१.२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये ग्राम क्रीडा संकुलाकरिता ग.नं.२३२ मधील क्षेत्र ६.८० हे. जागा निश्चित झालेली आहे. संबंधित ग्रामपंचायतीला निधी वितरीत करण्याची कार्यवाही तालुका क्रीडा संकुल समितीद्वारे करण्यात येत आहे. त्यामुळे खेळाडूंना सुविधा उपलब्ध होणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औंढानागनाथ (जि. हिंगोली) या तालुक्यातील करंजा येथे दलित वस्तीत पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(११) ३००६४ (१६-०१-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढानागनाथ (जि.हिंगोली) या तालुक्यातील करंजा येथे दोन शासकीय बोरवेल असून ती सर्वांसाठी खुली असतानाही दलित वस्तीतील ग्रामस्थांना पाणी उपलब्ध करुन दिले जात नाही

यामुळे तहसीलदार यांनी दलित वस्तीला बोअरवेलचे पाणी उपलब्ध करुन देण्याचे आदेश देवूनही अद्याप पाणी उपलब्ध करुन देण्यात आले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तद् नुसार दलित वस्तीत पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच दलित वस्तीतील पाणी देण्यास विरोध करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०५-२०१६) :**(१), (२) व (३) मौजे कंजारा गावातील दलित वस्तीतील ग्रामस्थांना अद्याप पाणी उपलब्ध करुन देण्यात आले नसल्याची बाब खरी नाही. याबाबतची वस्तुस्थिती अशी आहे की, सदर गावातील शासकीय बोअरवर एका खाजगी व्यक्तीने अतिक्रमण करुन त्या पाण्याचा वापर तो शेतीसाठी करीत असल्याचे निदर्शनास आले तद्ननंतर सदर अतिक्रमण काढून टाकल्यावर तेथे ग्रामपंचायतीची मोटार बसविण्यात आली. तथापि, त्यावेळी त्या बोअरला पाणी नसल्याचे आढळून आले. या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या तत्कालिन ग्रामसेवकाविरुध्द कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

शासकीय बोअरला पाणी नसले तरी गावातील एका खाजगी व्यक्तीच्या बोअरवरुन दलित वस्तीतील ग्रामस्थांना पाणीपुरवठा करण्यात येत असून तो आजतागायत चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### देवगड (जि.सिंधुदुर्ग) नळयोजनेचे देखभाल दुरुस्तीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ३०३२८ (२१-१२-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) नळयोजनेचे देखभाल दुरुस्तीचे काम जुन्या दराप्रमाणे परवडत नसल्यामुळे ठेकेदाराने ठेकेदारी सोडत असल्याचे पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पाणीपुरवठा विभागाकडून मुदतवाढ देऊन नवीन निविदा काढण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम प्रलंबित असल्याने देवगड जामसंडेचा पाणीप्रश्न आणखी गंभीर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त नळयोजना दुरूस्तीचे कामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०४-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे
(३) हे खरे नाही. प्रादेशिक देवगड नळ पाणी पुरवठा योजना सन २०१० मध्ये जिल्हा परिषदेकडे दैनंदिन संचलन व देखभाल दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आली आहे. सदर योजनेची दैनंदिन संचलन व देखभाल दुरुस्ती ही ठेकेदारामार्फत सुरु असून योजनेअंतर्गत सर्व गावांना पाणी पुरवठा सुरु आहे. नवीन ठेकेदार नेमणूकीबाबत निविदा प्रक्रीया चालू आहे.
(४) सन २०१५-१६ च्या टंचाई कृती आराखड्यात प्रादेशिक देवगड नळ पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीचे काम प्रस्तावित करण्यात आले असून त्यास जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांनी मंजूरी दिली आहे. तालुकास्तरावरुन त्याबाबत अंदाजपत्रके प्राप्त करुन घेण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व वाचनालयांसह १२ हजार ग्रंथालयाचे थकित अनुदान तातडीने देण्याबाबत**

**(१३) ३०५५३ (२३-१२-२०१५). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व वाचनालयांसह १२ हजार ग्रंथालयाचे अनुदान थकित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील वाचनालयांची थकित अनुदान निधीची रक्कम तातडीने देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांचेकडे दिनांक २२ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०४-२०१६) :**(१) नाही.
राज्यातील १२,१५० शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांमार्फत परिरक्षण अनुदान नियामानुसार प्रदान करण्यात आलेले आहे.
(२) नाही.

(३) राज्यातील सर्व १२,१५० ग्रंथालयांचे नियामानुसार असलेले अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने दहीहंडीला साहसी खेळाचा दर्जा देण्याबाबत घेतलेला निर्णय**

**(१४) ३१६२१ (२२-१२-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दहीहंडीला साहसी खेळाचा दर्जा देण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय, तसेच सदर प्रकरणी घेतलेल्या निर्णयामध्ये सुस्पष्टता नसल्याने निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०२-२०१६) :** (१) व (२) दिनांक ११.०८.२०१५ च्या शासन निर्णयान्वये गोंविदा या मानवी मनोरे उभारावयाच्या प्रकारास (खेळास) साहसी क्रीडा प्रकाराच्या दर्जा देण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. तसेच गोविंदा खेळाच्या आयोजनप्रसंगी सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाच्या संदर्भातील मार्गदर्शक सूचनाही सदर शासन निर्णया सोबतच्या परिशिष्टान्वये देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इंदीरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सफाईकामगारांची पद भरती करणेबाबत**

**(१५) ३२५२४ (२२-१२-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अधिष्ठाता नागपूर यांनी पत्र क्र. इंगाशावैमवरुना/ आस्था-३ प्रस्ताव/ २२/०४/२०१५ अन्वये मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना सदर महाविद्यालय व रुग्णालयाची विद्यार्थी क्षमता १५० झाल्यामुळे वाढत्या रुग्णालयीन खाटांसाठी नवीन वर्ग -४ (सफाईगार) पदांची निर्मीती करणे बाबतचे पत्र सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अधिष्ठाता इंदीरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांनी पत्र क्र. इंगोशावैमना /आस्था ३-४ / प्रस्ताव/ १५७-५८ /२०१५ अन्वये मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना १४१ अतिरिक्त सफाईकामगारांची आस्थापनेवर नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिष्ठाता, इंदीरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांनी पत्र क्र. इंगाशावैमना/ आस्था ३-४/ प्रस्ताव/ १५७ -५८ /२०१५ अन्वये संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना सफाईकामगारांची मंजूर पदे ३२ असून अतिरिक्त ३८ पदांचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०४-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) भाग क्र. २ व ३ मध्ये नमूद केलेले प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाच्या गाव येथे वाचनालय योजनेबाबत**

**(१६) ३४१२७ (२०-०१-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने ५ वर्षापूवी गाव येथे वाचनालय योजना राबविल्यामळे गावागावात वाचनालय सुरु होवून वाचन संस्कृती वाढीस लागलेली असताना, राज्यात शासनमान्य खाजगी अनुदानीत ११ हजार ९९६ वाचनालयांना २०१४-२०१५ वर्षातील दुसऱ्या टप्यातील ३६ कोटी ६१ लाख २८ हजाराचे अनुदान आर्थिक वर्ष संपूनही प्राप्त न झाल्याने या वाचनालयातील ग्रंथपाल, लिपीक व अन्य कर्मचारी असे एकूण २१ हजार ६१५ कर्मचारी वेतनापासून वंचित राहिले आहेत, तसेच पुस्तक खरेदी व इतर खर्च ठप्प झाल्याने या ग्रंथालयापुढे आर्थिक संकट उभे राहिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शासन मान्य खाजगी अनुदानीत ग्रंथालयाचे अनुदान न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) सदरहू ग्रंथालयांना थकित अनुदान अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०४-२०१६) :** (१) हे खरे नाही.
राज्यातील १२,१५० शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांमार्फत परिक्षण अनुदान नियामनुसार प्रदान करण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) राज्यातील सर्व १२,१५० ग्रंथालयाचे नियमानुसार असलेले अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक, (जि.नागपूर )येथील कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठासाठी भुसंपादन करणे व बांधकामासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(१७) ३४६३२ (२३-१२-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक, (जि.नागपूर) येथील कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठासाठी भुसंपादन व विद्यापीठाच्या विविध इमारती बांधकामासाठी निधी उपलब्ध करण्याचा प्रस्ताव माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुस-या आठवड्या पर्यंत प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळी शासनाने भुसंपादन करण्याची मान्यता देवूनही निधी अभावी भुसंपादन अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वाविद्यालय रामटेक, जि.नागपूर विद्यापीठाच्या विद्याशाखा विस्ताराकरीता शासनाने शासन ज्ञापन क्र.जमीन २०१५/प्र.क्र.२७५/ज-८, दि.२०.११.२०१५ अन्वये मौजा काळडोंगरी ता.नागपूर (ग्रा) येथील स.क्र.१२३, आरजी ५४.१४ हे आर.पैकी ५० एकर शासकीय जमीन विद्यापीठास उपलब्ध करुन दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये शालेय पोषण आहारात अंडी तसेच दूध पावडरचा समावेश करणेबाबत**

**(१८) ३५९५५ (२१-०१-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यामध्ये शालेय पोषण आहारात अंडी तसेच दूध पावडर चा समावेश करणेबाबत निर्णय् घेतले आहे असे माहे ऑगस्ट व सप्टेंबर २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण आहारात उकडलेली अंडी तसेच दूध पावडर देणे या योजनेचे साधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.विनोद तावडे (२९-०४-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातील साकोली (ता. साकोली) येथील क्रीडा संकुल लोकार्पणाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत**

**(१९) ३६१०९ (२२-१२-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील साकोली (ता. साकोली) येथील पंचशील वार्डात तयार करण्यात आलेले क्रीडा संकुल गत सहा वर्षापासून लोकार्पणाच्या प्रतिक्षेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रीडा संकुल बांधकाम विभागाने क्रीडा विभागाला हस्तांतरीत न केल्यामुळे क्रीडा संकुलाकडे संबंधित विभागाचे दर्लक्ष असल्याचे आक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१६)** :(१), (२) व (३) हे खरे नाही, शासन निर्णय दिनांक २६.०३.२००३ अनुसार तालुका क्रीडा संकुल, साकोली बांधकामासाठी रु.२५.०० लक्ष अनुदान वितरीत केले होते. त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांनी सदर प्रकल्पावर रु.२०.०० लक्षाचे अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र व प्रकल्पाचे फोटोग्राफ उपलब्ध करुन दिलेले आहेत. तथापि, प्रकल्प पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, प्रकल्प बांधकामाचे हस्तांतर तसेच रितसर ताबा संकुल समितीस अद्यापपर्यंत दिलेला नाही. तालुका क्रीडा संकुल समितीने सादर केलेल्या रु.७५.०० लक्ष अंदाजपत्रक व आराखड्यास दिनांक २८.०३.२०१३ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून एकूण ८० लक्ष निधी वितरीत केलेला आहे. त्याअनुषंगाने सद्यस्थिती संकुलामध्ये बास्केट कोर्ट, कार्यालयीन इमारत, इंनडोर हॉल, २०० मी. धावन पथ, विविध खेळाची मैदाने, संरक्षण भिंत इ.कामे प्रगतीपथावर आहेत. प्रलंबित कामे पूर्ण करुन सदर क्रीडा संकुलाचे लोकार्पण करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यात ४० टक्के कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२०) ३६१८२ (२१-१२-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात ४० टक्के कुटुंबात वैयक्तिक शौचालये नाहीत, हे खरे आहे काय,

(२) सुधारित वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात आला असून यावर्षी १०३ गावांमधील १४ हजार १३१ कुटुंबात वैयक्तिक शौचालय बांधण्याचे उदिष्ट ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सुधारित कृती आराखड्यावर आठही तालुक्यातील बीपीएल कुटुंबांमध्ये शौचालय बांधण्याचे उदिष्ट ठरविले आहे ते पुर्नत्वास नेण्यास कर्मचारी, अधिकारी अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०४-२०१६) :**(१) सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षण अहवालानुसार गोंदिया जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील २,२१,२५३ कुटुंबांची नोंद असून त्यापैकी ५९,३०४ कुटुंबांकडे शौचालय नाहीत. सदर कुटुंब संख्येची टक्केवारी ही मूळ कुटुंब संख्येच्या २६.८०% एवढी आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सुधारीत वार्षिक कृती आराखड्यानुसार गोंदिया जिल्ह्यातील ८ तालुक्यांमध्ये एकूण १४,१३१ वैयक्तिक शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट असून त्यात ६,५८३ बीपीएल कुटुंबांचा समावेश आहे. सदर उद्दिष्टांपैकी माहे, फेब्रुवारी, २०१६ अखेरपर्यंत २,२९३ बीपीएल कुटुंबांसाठी शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरीत लाभार्थ्यांना मार्च, २०१६ अखेरपर्यंत शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतस्तरावरील यंत्रणेकडून कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहेत. सदर उद्दिष्ट गाठण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असून निश्चित केलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**केंद्र शासनाने स्थापन केलेल्या मूल्य स्थिरता निधी (पीएसएफ) अंतर्गत प्रस्ताव सादर न केल्याबाबत**

**(२१) ३६२२३ (१४-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने स्थापन केलेल्या मूल्य स्थिरता निधी (पीएसएफ) निधीतून जीवनावश्यक वस्तूंचा पुरेसा साठा करणे, बाजारपेठेतील भाव वाढले असतील तर शिधावाटप किंवा अन्य

मार्गाने ते रास्त दरांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध करणे इत्यादी उपाय करता येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कांदे व डाळींचे भाववाढ झाली असतानाही शासनाने पीएसएफ निधीसाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधीकरिता सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर न करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-०४-२०१६) :**(१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) राज्य शासनाने दिनांक १९.१०.२०१५ च्या पत्रान्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या जीवनावश्यक वस्तुंवर दिनांक ३०.०९.२०१६ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत. त्यास अनुसरुन क्षेत्रिय कार्यालयांनी कार्यवाही केली आहे.

मुक्त केलेली तूरडाळ व मुक्त केलेल्या तूरीच्या भरडाईनंतर तयार झालेली तूरडाळ महाराष्ट्र राज्यातच रु.१००/- प्रतिकिलो या दराने विकली जाईल, तसेच मुक्त केलेले इतर कडधान्य महाराष्ट्र राज्यातच विकले जाईल, या अटीवर संबंधित व्यापाऱ्याकडून Indemnity Bond घेऊन, जप्त करण्यात आलेला तूर/तूरडाळ व इतर कडधान्याचा साठा त्याला परत करण्यात यावा, असे दिनांक २४.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्देश देण्यात आले.

भविष्यात तूर/तूरडाळ, खाद्यतेल, खाद्यतेल बीया व इतर कडधान्य यांच्या वाढीव किंमती नियंत्रित करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबतचा कृती आराखडा (Action Plan) तयार करण्यासाठी, दिनांक २८.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दर नियंत्रक समिती (Price Monitoring Committee) गठित करण्यात आली आहे.

जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत लागू असलेल्या साठा निर्बंधाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, याबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिनांक २९.०२.२०१६ च्या पत्रान्वये पुन्हा एकदा सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सक्करदरा ( जि. नागपूर) शासकीय आयुर्वेद व महाविद्यालय येथे १५० खाटांचे नविन रुग्णालय बांधण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२२) ३६४३२ (२०-०१-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सक्करदरा, (जि. नागपूर) शासकीय आयुर्वेद व महाविद्यालय येथे १५० खाटांचे नविन रुग्णालय बांधण्याचा प्रस्ताव गत ५ वर्षापूर्वी शासनाकडे पाठविण्यात आला असल्याचे दिनांक

१५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याठिकाणी सोईसुविधा व खाटांची संख्या कमी असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०४-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

सदर प्रस्तावांतर्गत संचालक आयुष यांनी रुपये ५,८५,९८०००/- इतक्या अनुदानाचा बांधकामासह प्रस्ताव दिनांक १४ जून, २०१३ व २१ मे, २०१५ रोजी प्राप्त झाला असून त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रशासकीय मान्यता घेण्यात येत असून, त्या विभागाने मागीतलेली आवश्यक व सुधारीत कागदपत्रे त्याविभागास देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नंदुरबार जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत ग्रामविकास योजनेंतर्गत संपूर्ण जिल्ह्यातील गावांना नळाद्‌वारे पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(२३) ३९११३ (२०-०१-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत ग्रामविकास योजनेंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात किती खेडेगावांना नळाद्‌वारे पाणीपुरवठा केला आहे तसेच बहुतेक शाळांना पाणी पुरवठा सुरु झाल्याचे कागदोपत्री दाखविले आहे परंतु अद्‌यापही प्रत्यक्षात पाणी पुरवठा सुरु झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर नळाद्‌वारे पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.
नंदूरबार जिल्ह्यात ग्रामविकास योजनेंतर्गत ८४७ पाणी पुरवठा योजना घेण्यात आल्या आहेत. तसेच एकूण १३८५ प्राथमिक शाळांना पाणी पुरवठा सुरु आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे धान्य गोदामाचे बांधकामाकरिता निधी मिळण्याबाबत**

**(२४) ३९७८८ (२८-०४-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे धान्याची साठवणूक करण्यासाठी धान्य गोदामाचे बांधकाम करण्याबाबत कार्यकारी अभियंता रोहयो सा.बा.चंद्रपूर यांच्या वतीने १७८.९८ लक्ष रूपये आणि १५३.६९ लक्ष रूपयांचा अंदाजपत्रकीय प्रस्ताव शासनाकडे पाठविला असता शासनाने प्र.मा.क्र.शासन निर्णय क्र.गोदाबा-१०१३/प्र.क्र.३४२/नापु-१६ ब, दिनांक ५ जुलै २०१३ नुसार दोन्ही प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असतांना सुध्दा अद्यापही सदर दोन्ही गोदामांचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिलेला नसल्याचे दिनांक २७ जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही गोदामाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०५-२०१६) :** (१), (२) व (३) ब्रम्हपूरी व सिंदेवाही येथील दि. ५.०७.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेल्या गोदाम बांधकामास सन २०१५-१६ मध्ये रु.९६,३०,७९३/- इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

---

**नागपूर शहरातील टेका नाका परिसरात अवैद्य औषधांचा साठा जप्त केल्याबाबत.**

**(२५) ४०१८७ (१७-०३-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (जि.नागपूर) शहरातील टेका नाका परिसरात विनापरवाना औषधांची अवैध साठवणूक केल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या तक्रारीवरून श्री. फराज फारूख खान, श्री. अयान अहमद इमरान यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, या प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०४-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. फराज फारुख हाडा व अमान अहमद इमरान अहमद या दोन व्यक्तींविरुध्द दिनांक ३१/१२/२०१५ रोजी प्रथम खबर अहवाल क्र. ४२०/२०१५ नोंदविण्यात आला आहे. सदर दोन्ही आरोपिंना दिनांक ३१/१२/२०१५ रोजी अटक करण्यात आली होती.

(३) होय, दिनांक ३०/१२/२०१५ रोजी मे. रझा मोबाईल ॲण्ड स्टेशनरी शॉप, टेका नाका, नागपूर या पेढीतून विना परवाना औषधांची अवैध साठवणूक करुन विक्री करत असल्याबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार दिनांक ३०/१२/२०१५ रोजी चौकशीस्तव अन्न व औषध प्रशासनाच्या नागपूर कार्यालयातील औषध निरीक्षकांनी धाड टाकली. त्यावेळी Spasmo-proxyvon plus, B.No. JQ१०८२४, mfg dt.Oct, १५, exp date Sept,२०१७, Mgd by M/s Wockard ltd., p.No.५७, Village, Kunjhal, P.P. Barotiwala, Tal.Nalagarh, Dist. Solan(H.P.) या औषधाच्या ८ स्ट्रीप्स एकूण १०४ कॅप्सूलचा विनापरवाना साठा आढळून आला. सदर साठयातून नमुने विश्लेषणास्तव घेऊन उर्वरित साठा जप्त करुन ताब्यात घेतला आहे. विश्लेषणासाठी घेतलेल्या नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. तसेच सदर जागेत Spasmo-proxyvon plus या औषधीचे विविध बॅच नं. व इतर छापील मजकूर नमूद असलेले ९ बॉक्स आढळून आले. व्यक्तींविरुध्द दिनांक ३१/१२/२०१५ रोजी प्रथम खबर अहवाल क्र. ४२०/२०१५ नोंदविण्यात आला आहे. सदर दोन्ही आरोपींना दिनांक ३१/१२/२०१५ रोजी अटक करण्यात आली होती उपरोक्त दोन्ही आरोपींच्या चौकशीदरम्यान आरोपींकडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन पोलिसांनी उबेद अन्सारी या इसमास सुध्दा दिनांक १/१/२०१६ रोजी अटक केली. तीनही आरोपींची दि.१२/१/२०१६ रोजी जामिनावर सुटका झाली आहे. याप्रकरणी पोलिस तसेच अन्न व औषध प्रशासनाकडून तपास सुरु आहे. तपास पूर्ण होताच पुढील कारवाई घेण्यात येईल

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबत**

**(२६) ४०८०१ (२८-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याकरिता नाशिक विकास कार्यक्रमांतर्गत दिनांक २७ ऑगस्ट २००९ रोजी रूपये १० कोटी नियतव्यय निश्चित केल्यानुसार जिल्हाधिकारी नाशिक यांनी दिनांक ५ नोव्हेंबर २०१४ रोजी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळास सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी मुंढेगाव ता.इगतपुरी येथील जागा सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे हस्तांतरित करण्याकरिता महसूल व वन विभागास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चित्रपटसृष्टीसाठी सांस्कृतिक कार्य विभागास जमीनीचे हस्तांतरण करून सदर चित्रपटसृष्टीचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०५-२०१६) :**(१) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी जागेशी संबंधित कागदपत्रे महामंडळास पाठविली आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) मुंढेगाव ता.इगतपुरी येथील जागा सांस्कृतिक कार्य विभागास हस्तांतरीत करण्याची कार्यवाही महसूल विभागाकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लाप,लापखुर्द, दाभाड,बांद्रे, चाणे, झीडके किरवली भिणार (ता.भिवंडी,जि.ठाणे) या गावांमधील पाणी पुरवठा योजनेमधील गैरव्यवहाराबाबत**

**(२७) ४१७२८ (१०-०३-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लाप,लापखुर्द, दाभाड,बांद्रे, चाणे,झीडके किरवली भिणार (ता.भिवंडी,जि.ठाणे) या गावांमध्ये पाणी पुरवठा योजना सुस्थितीत असताना सुद्धा भारत निर्माण योजना पाणी पुरवठा योजनेंतर्गत सन २०१३-१४ मध्ये ई-टेंडरिंग न करताच बोगस नोंदणीपत्र पाणी पुरवठा करून अधिकाऱ्यांनी ठेकेदारांशी संगनमत करून मोठ्या प्रमाणात निधीचा अपहार केल्याने लापखुर्द येथील समाजसेवक राजाराम गणपत पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी तक्रार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार खोटी कागदपत्रे सादर करणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०४-२०१६) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दाभाड नळ पाणी पुरवठा योजनेबाबत तक्रार प्राप्त झाल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी चौकशी अधिकारी नेमून चौकशी केली आहे. सदर चौकशीत योजनेच्या मंजूरीसाठी बोगस दस्तऐवज सादर केल्याचे तसेच योजनेच्या कामात अनियमितता झाल्याचे स्पष्ट झाल्याने संबंधित ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्या विरुध्द FIR (FIR No. ५७/२०१६) दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात तुरडाळ भाव स्थिर ठेवण्याबाबत तसेच सोलापूर येथे भेसळयुक्त डाळीची होत असलेली विक्री

**(२८) ४२३११ (२८-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तुरडाळ रु. २०० किलो या दराने विकली जात असल्याने सोलापूर जिल्हयातील ग्रामीण भागात लाख आणि हरभऱ्याची डाळ सर्रासपणे विकली जात असून लग्नसराईत व समारंभात मोठयाप्रमाणात भेसळयुक्त डाळ वापरली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यात तुरडाळ भाव स्थिर ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सोलापूर येथे भेसळयुक्त डाळ विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यात सध्या तूरडाळीचा भाव रु.१३०/- ते रु.१३५/- प्रतीकिलो असा असून, लग्नसराई किंवा लग्न समारंभात भेसळयुक्त डाळ वापरली जात असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) राज्य शासनाने राज्यात डाळी, खाद्यतेल व खाद्यतेल बीया या जीवनावश्यक वस्तूंवर दि.३०.९.२०१६ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत. तसेच डाळींकरीता ठरावीक कालावधीसाठी दर नियंत्रक कायद्याच्या प्रारुपास मा.मंत्री मंडळाने मान्यता दिलेली असून त्यानुसार सदर प्रारुप केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी विधी व न्याय विभागामार्फत पाठविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याचे सुशोभिकरण करण्याबाबत

**(२९) ४२३८१ (२८-०४-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील घोडबंदर रोड येथील ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याची दयनीय अवस्था झालेली असतानाही या किल्ल्याच्या सुशोभिकरणा करिता अद्याप कोणतीही कार्यवाही

करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त किल्ल्याचे सुशोभिकरणास विलंब होण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर किल्ल्याचे सुशोभिकरण करून येथे आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०५-२०१६) :** (१) होय,

(२) व (३) घोडबंदर किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबत प्राथमिक अधिसूचना दिनांक २२.३.२०६ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेवर दोन महिन्याच्या आत प्राप्त हरकती विचारात घेतल्यानंतर सदर किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबतची अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गड-किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत करावयाच्या उपाययोजना

**(३०) ४२५७२ (२८-०४-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गड-किल्ल्यांची दुर्दशा तसेच या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांची आढावा बैठक घेतल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील पाच किल्ल्यांच्या संवर्धनासाठी १२ कोटी रूपयांचा विशेष आराखडा शासनाने तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आराखड्याचे स्वरूप काय आहे व यासंदर्भात राष्ट्रीय पुरातत्व विभागाबरोबर बोलणी सुरु असून त्याकरिता सामंजस्य करार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यात लोकसहभागातून दुर्गसंवर्धनाचा प्रयत्न करण्यासाठी शासनाने गडसंवर्धन समिती नेमली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी येत असलेल्या अडचणी दूर करुन गड-किल्ल्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०५-२०१६) :**(१) ,(२), (३), (४), (५) व (६) मा. मंत्री सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गड संवर्धन समितीची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीच्या नियमित बैठका घेण्यात आल्या. यात गड संवर्धनाकरिता करावयाच्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. त्यास अनुसरून राज्यातील ५ विभागीय स्तरांवर गड संवर्धन कार्यशाळा घेण्यात आल्या. तसेच समितीने शिफारस केल्यानुसार राज्यातील १४ किल्ले मॉडेल फोर्ट म्हणून विकसित करण्यात येत आहे. त्यापैकी माणिकगड किल्ला, नगरधन किल्ला, अंबागड किल्ला, तोरणा किल्ला, भुदरगड किल्ला, अंतूर किल्ला, औसा किल्ला, गाळणा किल्ला, शिरंगाव किल्ला या किल्ल्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. गड संवर्धन समितीची दिनांक ०१/०४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये पुनर्रचना करण्यात आली आहे. सदर समितीच्या शिफारशीनुसार पुढील टप्प्यात १४ किल्ले मॉडेल फोर्ट म्हणून विकसित करण्यात येणार आहे. तसेच सदर समितीच्या माध्यमातून राज्यातील गडप्रेमी संस्थांच्या मदतीने दिनांक ०१ मे ते ७ मे या कालावधीत किल्ले स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच राष्ट्रीय संरक्षित स्मारकांच्या सभोवताली पर्यटकांना सेवा सुविधा पुरवण्याकरिता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व केंद्रीय पुरातत्व विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

### सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातील नदीकाठाच्या गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत

**(३१) ४३००० (२८-०४-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातील नदीकाठाच्या गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२५-०५-२०१६) :** (१) नाही.

(२) उजनी धरणातील नदीकाठच्या गावांना स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना व हातपंपाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत  नाही.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**राज्य शासनाने गावनिहाय पाणीटंचाईचा आराखडा तयार करण्याचा घेतलेला निर्णय**

**(३२) ४३२०२ (२८-०४-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शासनाने गावनिहाय पाणीटंचाईचा आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यन्त किती गावांचा आराखडा तयार करण्यात आला आहे,

(३) असल्यास, गावनिहाय पाणी टंचाईचा आराखडा तयार करण्याचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२५-०५-२०१६) :**(१) होय,

(२) व (३) ऑक्टोबर २०१५ ते जून २०१६ या कालावधीकरिता संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यामध्ये ३८४७० इतक्या गावांमध्ये ७२३७८ इतक्या उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या पुरातत्व व वस्तू संग्रहालय संचालनालयाला संचालक नसल्याबाबत**

**(३३) ४४४५३ (२८-०४-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या पुरातत्व व वस्तू संग्रहालय संचालनालयाला गत अडीच ते तीन वर्षापासून संचालक नसल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्षापूर्वी पूर्णवेळ संचालक नेमण्याची घोषणा मा. सांस्कृतिक मंत्र्यांनी करुनही अद्यापी संचालक नेमण्यात न येणे, तसेच गेल्या १८ वर्षात एकही पुरातत्ववेत्ता या पदावर नेमण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील एकूण३७१ संरक्षित वास्तूंच्या संरक्षण संवर्धनाची जबाबदारी असणा-या या संचालनालयासाठी ३०० कर्मचा-यांची तरतूद असून, त्यापैकी ९४ पदे रिक्त व ७९ पदांचे काम बाहेरुन करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रायगड महोत्सवाकरीता शासनाने कोटयवधी रुपयांचा खर्च केला, परंतु गड संवर्धन योजने अंतर्गत चालू वर्षात पूर्ण करायच्या १२ कोटी ७० लाख रुपयांची कामे सुरु झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गड संवर्धनाच्या कामाकरीता जाहीर झालेल्या ६१ कोटी रुपयांपैकी या आर्थिक वर्षात प्रत्यक्षात किती कोटी रुपये खर्च करण्यात आले, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०५-२०१६) :**(१) होय
(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने संचालक नेमण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

(३) अंशत: खरे आहे.

गट क व गट ड संवर्गातील ६४ रिक्त पदांची कामे नियमानुसार बाह्ययंत्रणेद्वारे करण्यात येत आहे.

(४) व (५) नाही.

गडसंवर्धनाकरिता मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी मार्च २०१६ अखेर रु. ३.७५ कोटी रकमेची कामे पूर्ण करण्यात आली असून कामे प्रगतीपथावर आहेत.

---

### राज्यात रेशनकार्ड बायोमेट्रिक आधारलिंक करण्याबाबत मुदतवाढ मिळण्याबाबत

**(३४) ४४६२८ (२८-०४-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रेशनकार्ड बायोमेट्रिक आधारलिंक करण्यासाठी शासनाने मोठया प्रमाणावर मोहिम सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी कागदपत्र भरून देण्याचा शेवटचा दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ असल्याने खेडेगावातील खेडूत तसेच रानवनात राहणारे आदिवासी यांच्यापर्यन्त ही बाब पाहिजे त्याप्रमाणात पोहचली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत ही मुदत दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत वाढवून द्यावी अशी मागणी सर्वस्तरावरुन शासनाकडे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०५-२०१६) : (**१) होय.
(२) नाही. लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक व मोबाईल क्रमांक संकलित करण्याचे काम जून २०१५ पासून करण्यात येत आहे. रास्तभाव दुकानामध्ये धान्य घेण्यासाठी येणा-या प्रत्येक लाभार्थ्याला याची माहिती देण्यात आलेली आहे. तसेच, रास्तभाव दुकानदार, पोलीस पाटील, तलाठी व आशा वर्कर, इ. मार्फत लाभार्थ्यांची माहिती संकलित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
(३) होय.
(४) शासनाने आधार क्रमांक संकलित करण्यासाठी ३१ मे, २०१६ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ११ गावांतील पाणी योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(३५) ४५३०९ (१०-०३-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ११ गावांतील पाणी योजनेमध्ये सुमारे रुपये अडीच कोटींचा गैरव्यवहार झाला असून सदर गैरव्यवहाराची चौकशी तातडीने व योग्य प्रकारे करावी, या मागणीकरिता दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजीपासून शिरोळ तहसिलदार कार्यालयासमोर अंकुश संस्थेचे पदाधिकारी बेमुदत उपोषणास बसले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेच्या मागणीनुसार या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०४-२०१६) : (**१) हे खरे नाही. शिरोळ तालुक्यातील १२ योजनांच्या चौकशीच्या मागणीसाठी अंकुश संस्थेने दि.१५.०८.२०१५ रोजी उपोषणास बसणार म्हणुन नोटीस दिली होती. तथापि, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरोळ यांचे पातळीवर चर्चा होऊन उपोषणास बसले नाहीत.
(२) व (३) सदर १२ योजनांपैकी २ योजनांचे तक्रारीत तथ्य नसलेने निकाली काढण्यात आल्या, ३ योजनांतील अनियमिततेबाबत संबंधितावर खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात

आली आहे, २ योजनांबाबत वसुली करण्यात आली आहे, ४ योजनांच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधिताकडून खुलासे मागविण्यात आले आहेत व एका योजनेची जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त संयुक्त पहाणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**घाटंजी(जि.यवतमाळ) तालुक्यात धान्याचा काळाबाजार सुरु असल्याबाबत**

**(३६) ४६५९४ (२८-०४-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यात धान्याचा काळाबाजार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरिबांना हक्काचे धान्य मिळविण्यासाठी रेशन दुकानावर वारंवार पायपीट करावी लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जिल्हयातील पुरवठा विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील ७ हजारावर कलावंताना समाज कल्याण विभागामार्फत देण्यात येणारे मानधन मागील वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ४६९५२ (२४-०२-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील ७ हजारावर कलावंताना समाज कल्याण विभागामार्फत देण्यात येणारे मानधन गेल्या वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वृध्द कलावतांना त्यांचे प्रलंबित असलेले मानधन त्वरीत व नियमित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०४-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) अमरावती जिल्हयात वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंत मानधन योजनेअंतर्गत एकूण ६३७ इतके लाभार्थी असून ऑक्टोबर, २०१५ पर्यंतचा निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

---

**मराठवाड्यासह बीड,जालना जिल्हयात भूवैज्ञानिकांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(३८) ४७२७६ (२८-०४-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील जिल्हयांमध्ये भूवैज्ञानिकांची एकूण ३२ पदे रिक्त असून त्यापैकी बीड जिल्हयात ६ पदे तसेच जालना जिल्हयात २ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदे रिक्त असल्यामुळे भूजल सर्वेक्षणाची काम प्रलंबित असून सदर पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-०५-२०१६) :**(१) मराठवाड्यातील जिल्हयांमध्ये भूवैज्ञानिकांच्या मंजूर ७९ पदांपैकी एकूण ३८ पदे रिक्त आहेत. त्यापैकी बीड जिल्हयात ८ पदे तर जालना जिल्हयात ४ पदे रिक्त आहेत.

(२) भूजल सर्वेक्षणाची कामे प्रंलबित नसून, आवश्यकतेनुसार उपलब्ध असलेल्या भूवैज्ञानिकांकडून सर्वेक्षणाची कामे करुन घेण्यात आलेली आहेत. इतर विभागात नेमणूकीमुळ बदलीमुळे सेवानिवृत्तीमुळे व पदोन्नतीमुळे पदे रिक्त आहेत.

(३) वरिष्ठ भूवैज्ञानिक व सहाय्यक भूवैज्ञानिकांची ५०% पदे तसेच कनिष्ठ भूवैज्ञानिकांची १००% पदे सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतात. वित्त विभागाच्या दि.२ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असणा-या पदांपैकी ५० % किंवा एकूण संवर्गाच्या ४ % यापैकी जे कमी असेल इतकीच पदे भरण्याबाबत तरतुदी आहेत. भूवैज्ञानिकांची पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बळसोंड (जि.हिंगोली) येथील नळयोजनेचा प्रस्ताव**
**जिल्हा परिषदेकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(३९) ४८३६८ (२८-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बळसोंड (जि.हिंगोली) येथील नळयोजनेच्या प्रस्तावाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता दिली असून सदर प्रस्ताव शिफारसपत्रासाठी जिल्हा परिषदेकडे प्रलंबित आहे त्यामुळे येथील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी गावकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला तातडीने शिफारसपत्र देऊन प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी वरिष्ठ कार्यालयात पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही

(२) बळसोंड नळ पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, हिंगोली यांनी दिनांक १८.१.२०१६ रोजी मान्यतेसाठी सादर केला आहे. तथापि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजनेची अंमलबजावणी केंद्र निर्देशानुसार करण्यात येते, या संदर्भात केंद्राच्या दि.२९.०७.२०१५ च्या पत्रान्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत नवीन पाणी पुरवठा योजना घेणेसंदर्भात (काही अपवाद वगळता) निर्बंध घातले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वच्छ भारत अभियान या योजनेकरिता निधी उपलब्धतेबाबत**

**(४०) ४८८३२ (२८-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छ भारत अभियान या योजनेकरिता केंद्र शासनाचा ७५ टक्के हिस्सा व राज्य शासनाचा २५ टक्के हिस्सा अशा प्रकारे निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार राज्य शासनाने आपल्या हिश्श्याचे २४ कोटी ८९ लाख रुपये उपलब्ध करुन दिले असून केंद्र शासनाने फक्त ५० टक्के हिस्सा दिला असल्याने राज्याने दिलेले १४ कोटी रुपये परत करण्याची तयारी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने आपल्या हिश्श्याची रक्कम देण्यास नकार देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-०५-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सन २०१४-१५ मध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत केंद्र हिस्सा ७५ टक्के व राज्य हिस्सा २५ टक्के असे वित्तीय आकृतीबंध होते. तथापि, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के असे सुधारित वित्तीय आकृतीबंध करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिध्दपूर (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील भारत राज गॅस एजन्सी बीपीएल गॅस धारकांकडून जास्त पैसे घेत असल्याबाबत**

**(४१) ४८८६१ (२८-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिध्दपूर (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील भारत राज गॅस एजन्सी बीपीएल गॅस धारकांकडून जास्त पैसे घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित गॅस एजन्सीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

याबाबतची तक्रार जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती तसेच भारत पेट्रोलियम कॉपेरिशन लि. या तेल कंपनीकडे प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हा परिषदे अंतर्गत अनेक नळ पाणी पुरवठा योजना निधी अभावी अपुर्ण असल्याबाबत**

**(४२) ४९२२३ (१०-०३-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)बुलडाणा जिल्हा परिषदे अंतर्गत भारत निर्माण, जलस्वराज व इतर योजना अंतर्गत अनेक नळ पाणी पुरवठा योजना निधी अभावी अपूर्ण असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे संबंधित गावामध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नळ पाणी पुरवठा त्वरीत पुर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०४-२०१६) :** (१) आणि (२) हे खरे नाही. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत (भारत निर्माण योजना) ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या मागणीनुसार निधी देण्यात येतो. जलस्वराज टप्पा- २ अंतर्गत ७ गावांचे सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूरीच्या प्रक्रियेत आहेत.
(३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जि.प.बुलडाणा यांना नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी शासनामार्फत वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यापुढे निधीच्या उपलब्धतेनुसार वितरण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील जऊळका रेल्वे, उडी, वरदरी बु. या तीन गावांची पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत**

**(४३) ४९८९५ (१०-०३-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील जऊळका रेल्वे, उडी, वरदरी बु. या तीन गावांना पाणीपुरवठा करणारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना ही तब्बल १८ वर्षापासून बंद असून ही योजना दिनांक ३० जानेवारी, पर्यंत चालू न झाल्यास मुलाबाळांसह पाण्याच्या टाकीवर शोले आंदोलन करण्यात येईल, असा इशारा उडी येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी व जीवन प्राधिकरण कार्यालय यांना निवेदनाद्वारे दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त गावांना नियोजित पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०४-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) योजनेची दुरुस्ती करुन सदर गावांना दिनांक ४/२/२०१६ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तसेच सदर योजनेचा सन २०१५-१६ च्या पाणी टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्तीचा प्रस्तावावर कार्यवाही सुरु असून, टंचाई कृती आराखडयात वरदरी बु. या गावाकरीता टँकरने, तसेच उडी व जऊळका या गावांकरीता खाजगी विहीर अधिग्रहणाद्वारे पाणी पुरवठा करणे या उपाय योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हरिहरेश्वर (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील भारत निर्माण योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनेबाबत**

**(४४) ५११४९ (१०-०३-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरिहरेश्वर (ता.श्रीवर्धन,जि.रायगड) येथील पाणी पुरवठा योजना भारत निर्माण योजनेंतर्गत सन २००८ पासून सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेकरिता निधी वितरीत होऊनही संबंधित समितीने योजना पूर्ण न केल्याने होणाऱ्या पाणी टंचाईसाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने योजना अपूर्ण ठेवणाऱ्या समितीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०४-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) या योजनेतील हरेश्वर व मारळ या दोन्ही गावांसाठी बांधलेल्या आर.सी.सी. साठवण चेंबरचे काम पूर्ण झाले असून सदर चेंबर मधून हरेश्वर गावासाठी अस्तित्वातील जुन्या गुरुत्व वाहिनीतून पाणी पुरवठा करण्यात आला आहे. मारळ गावासाठी सद्य:स्थितीत अस्तित्वातील लघु नळ पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) होय, सदर योजनेतील आर. सी. बंधाऱ्याचे संकल्प चित्र स्थानिक भूगर्भीय परिस्थितीनुसार बदलावे लागले आहे. त्यामुळे योजनेच्या अंदाजपत्रकात वाढ होऊन शासन स्तरावरुन योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी लागली आहे. तसेच स्थानिक अडचणी व नव्याने ई निविदा प्रक्रीया यामुळे योजनेतील सर्व कामे पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. सदर योजनेचे काम जून, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. समितीने वेळोवेळी काम करुन सद्य:स्थितीत तात्पुरता पाणी पुरवठा सुरु ठेवलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**मौजे बारी, जहागिरदारवाडी (ता. अकोले, जि.अहमदनगर) येथील पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत**

**(४५) ५१३०५ (१०-०३-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बारी, जहागिरदारवाडी (ता.अकोले, जि.अहमदनगर) या गावांसाठी असलेल्या पाणीपुरवठा योजनेसाठी सुमारे दोन वर्षापूर्वी सुरुवात होऊन योजनेचे काम अद्याप अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर योजनेचे काम पूर्ण करुन गावांना पुरेसा पाणीपुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०४-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर योजनेस ऑक्टोबर २००६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली परंतु निधी व लोकवर्गणी अभावी या योजनेची निविदा सन २००९-१० मध्ये मूळ मंजूर योजनेच्या किंमतीवर काढण्यात आली व निविदा सन २०१०-११ मध्ये निश्चित केल्यामुळे योजनेची निविदा ही वाढीव ७५ % जादा दराने मंजूर करावी लागली. त्यामुळे योजना सुधारित करणे आवश्यक होऊन सुधारित योजना शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आली.त्यामुळे सदर योजनेच्या कामास विलंब झाला आहे. सुधारित योजनेस शासन निर्णय दि.१२.८.२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता व दि. १०.३.२०१५ रोजी सुधारित तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर योजनेची उर्वरित कामे हाती घेण्यात आली आहेत.
(३) सद्यस्थितीत योजनेची कामे पूर्णत्वास असून योजनेची चाचणी घेणे प्रगतीपथावर आहे. त्यानंतर लगेचच गावांस पाणी पुरवठा सुरू करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**राज्यातील शिधापत्रिका आधार योजनेशी संलग्न करण्याच्या कामाबाबत**

**(४६) ५१८५० (२८-०४-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिधापत्रिका आधार योजनेशी संलग्न करण्याचे काम शासनाचा निधी व वेळ खर्च होऊनही झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्व शिधापत्रिका आधार संलग्न करण्याचे काम पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०५-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) या योजनेवर राज्यात काम सुरु असून सद्यस्थितीत राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत राज्यातील एकूण ७ कोटी लाभार्थ्यापैकी ५ कोटी ६१ लाख लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकाचे सिडींग करण्यात आलेले आहे. आधार क्रमांक व इतर माहिती PDS Database मध्ये समाविष्ट करण्याकरिता क्षेत्रीय स्तरावर डाटा एंट्री एजन्सीजची नियुक्ती करण्यात आलेली आहे व नवीन आधार क्रमांक नोंदणीसाठी जिल्हास्तरावर कॅम्पचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच, उर्वरित काम प्रगतीपथावर असून ते लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील साखर नॉमीनी यांनी केलेला गैरव्यवहार

**(४७) ५१८६४ (१०-०३-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील साखर नॉमीनी यांनी सन २०१० ते २०१४ या कालावधीत साखर कारखान्यांकडून शासना मार्फत मिळालेली लेव्हीची साखर शिधावाटप धान्य दुकानदारांना न देता अधिकाऱ्यांशी संगनमत करुन खुल्याबाजारात विक्री केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ४ मे, २०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार यवतमाळ जिल्हाधिकारी यांचे मार्फत चौकशी करुन सदर जिल्ह्यात साखर नॉमीनी यांनी साखर खुल्या बाजारात विक्री करुन किती रक्कमेचा अपहार केला व सदर रक्कम वसुल करण्यात येवून संबंधीत साखर नॉमीनींना अटक करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०४-२०१६) :** (१) होय.

(२) यवतमाळ जिल्ह्यातील साखर नॉमिनी यांनी सन २०१० ते २०१४ या कालावधीत साखर कारखान्याकडून शासनामार्फत मिळालेली लेव्हीची साखर शिधावाटप धान्य दुकानदारांना न देता अधिकाऱ्यांशी संगनमत करून खुल्या बाजारात विक्री केल्याप्रकरणी विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र दि.४ मे, २०१३ नुसार तहसिल स्तरावर निरीक्षण अधिकारी यांचे अधिनस्त पथक तयार करून संबंधित नॉमीनीचे तपासणी करून तपासणीअंती उघड झालेल्या ४ प्रकरणांची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे :-

(अ) यवतमाळ तालुक्यातील साखर नॉमीनी श्री एच. डब्लु. धलवार यांनी २९३.५० क्विं. साखरेचा अपहार केल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांचेकडून अपहारीत साखरेची रक्कम रू. ३८५५९०/- वसूल करण्यात आली आहे. तसेच साखर अपहार प्रकरणी संबंधित नॉमीनीवर दोषारोप पत्र दाखल झाले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(ब) यवतमाळ तालुक्यातील साखर नॉमीनी श्री. मनोज पसारी, यांनी १२५३.२५ क्विं. साखरेचा अपहार केल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांचेकडून अपहारित साखरेची रक्कम रू. ४२,९०,६२६.७०/- वसूल करावयाची आहे. साखर अपहार प्रकरणी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल झाले असून, प्रकरणात न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यवतमाळ यांनी स्टेटस्को दिल्यामुळे वसूलीची कार्यवाही सद्यस्थितीमध्ये स्थगित आहे.

(क) महागाव तालुक्यातील साखर नॉमीनी अध्यक्ष स्व. उत्तमराव सुरोशे बहुउद्देशिय संस्था महागाव यांनी ४८० क्विं. साखरेचा अपहार केल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांचेकडून अपहारीत साखरेची रक्कम रू. १५,३६,०००/- वसूल करणेची कारवाई चालु आहे. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(ड) उमरखेड तालुक्यातील साखर नॉमीनी, अध्यक्ष शैलेश दिलीपराव सुरोशे, यांनी ७६५ क्विं. साखरेचा अपहार केल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांचेकडून साखरेच्या

अपहाराची रक्कम रू. १४ लक्ष १५ हजार वसूल करणेची कारवाई चालु आहे. गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) व (४) साखर अपहार प्रकरणी विभागीय आयुक्त कार्यालयाचे पत्र दि.९ जानेवारी, २०१५ नुसार यवतमाळ जिल्हयातील साखरेची तपासणी करणेकरिता तपासणी पथक नेमण्यात आले आहे.

---

**लातूर जिल्हयात पाणी टंचाईमुळे उद्योगधंदे व रुग्णालयातील शस्त्रक्रिया करणे बंद झाल्याबाबत**

**(४८) ५२०१८ (१०-०३-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात पाणी टंचाईचा प्रश्न तीव्र असून टँकरच्या पाणीपुरवठ्यावरून हाणामाऱ्यांचे प्रकार घडत आहेत तसेच पाण्याअभावी शासकीय वैद्यकीय रुग्ण्यालयांनी शस्त्रक्रिया करणे थांबविल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच लातूर शहराला पाणी पुरवठा करणारे सर्व जलस्त्रोत आटल्यामूळे लातूर शहरात पाण्यावरून आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली असून अनेक उद्योगधंदे बंद पडले असून ५० हजार मजूरांनी इतरत्र स्थलांतर केले आहे तसेच विद्यार्थी वसतीगृहे, दवाखान्यातील ऑपरेशन थिएटर बंद ठेवण्याची वेळ आली असल्याचे माहे २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ब्रम्हपूरी (ता.अहमदपूर, जि.लातूर) येथील मनोहर अशोक हराळे वय १४, रोहीत बालाजी भगत वय १५ या दोन शालेय विद्यार्थ्यांचा पाणी टंचाईने बळी घेतल्याची घटना दिनांक २१ फेब्रुवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पाणी पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०४-२०१६) :** (१) हे खरे नाही.

लातूर शहरात टँकरच्या पाणी पुरवठ्यावरुन हाणामा-याचे प्रकार घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तसेच पाणी टंचाईमुळे शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील शस्त्रक्रिया बंद करण्यात आल्या नसून त्या एक दिवस पुढे ढकलण्यात आल्या होत्या.

(२) हे खरे नाही.

लातूर शहरातील उद्योग पाण्याच्या टंचाईमुळे बंद पडत असल्याचा कोणताही अर्ज महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांच्याकडे प्राप्त झालेला नाही.

लातूर जिल्ह्यात कोणतेही शासकीय वसतीगृह अथवा खाजगी स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविले जाणारे अनुदानित वसतीगृह पाण्याअभावी बंद झालेले नाहीत.

(३) व (४) अंशतः खरे आहे.

दिनांक २१.०२.२०१६ रोजी मनोहर अशोक हराळे व रोहित बालाजी भगत ही मुले तलावामध्ये पोहणेसाठी गेले असता सदरची घटना घडलेली आहे. बुडून मृत्यु झाल्याबाबत पोस्टमार्टम (शव परीक्षण)अहवाल आहे.

ब्रम्हपूरी गावात सद्यस्थितीत दोन खाजगी बोअरवेलद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कहांडळवाडी (वावी, ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील रास्तभाव दुकानाचा परवानां रद्द करण्याबाबत**

**(४९) ५२४६३ (१०-०३-२०१६). अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कहांडळवाडी (वावी, ता. सिन्नर, जि.नाशिक) येथील रास्तभाव दुकानदार धान्य व रॉकेलचा शिधापत्रिकाधारकांना पुरवठा न करता अवैध साठा करीत असल्याने सदर दुकानदार अपात्र असून त्याचा परवाना रद्द करुन त्यास पुन्हा दुकान चालविण्यास देऊ नये असे आदेश झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुकानदारास शासनाने पुन्हा रास्त भाव दुकानाचा परवाना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर दुकानाचा परवाना रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०१-०४-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. मौजे कहांडळवाडी, ता.सिन्नर येथील संबधित परवानाधारक यांचे रास्तभाव दुकानाचे प्राधिकारपत्र उप विभागीय अधिकारी, निफाड यांनी दिनांक ३१.०८.२००० रोजी रद्द केले होते. याविरुद्धचे संबधित परवानाधारक यांचे अपील उप आयुक्त (पुरवठा), नाशिक विभाग, नाशिक यांनी दि.१४/०३/२०११ च्या आदेशान्वये ना-मंजुर केले होते.

(२) व (३) संबधित परवानाधारक यांनी, महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरण व विनियमन) आदेश, १९७५ मधील तरतुदीस अनुसरुन तत्कालिन मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचेकडे पुनरिक्षण अर्ज दाखल केला होता.जिवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या संविधानिक आदेशामधील तरतुदीस अनुसरुन तत्कालिन मंत्री, (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांनी संबधित परवानाधारक यांना सुनावणीची संधी देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले होते. पुनरिक्षण अर्जाची बाब अर्धन्यायिक स्वरुपाची असल्याने त्यावर सुनावणी घेऊन

निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार पुनरिक्षण प्राधिकारी म्हणून मंत्री, (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचा असल्याने त्या अधिकारांतर्गत तत्कालिन मंत्री महोदयांनी दि.११/०९/२०१४ च्या आदेशान्वये संबधित परवानाधारक यांचा पुनरिक्षण अर्ज दंडात्मक कारवाई करुन अंशत: मंजुर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**महाराष्ट्र केरोसीन हॉकर्स-रिटेलर्स कामगार संघटनेच्या मागण्यांबाबत**

**(५०) ५२८५९ (२८-०४-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र केरोसीन हॉकर्स-रिटेलर्स कामगार संघटनेने आपल्या मागण्यांचे निवेदन मा. मुख्यमंत्री, मा. अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०५-२०१६) :**(१) व (२) किरकोळ व हॉकर्स केरोसिन परवानाधारकांच्या कोट्यात करण्यात आलेली कपात रद्द करणे, गॅस सिलेंडर वाटपाची डिलरशीप देणे, कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देणे, शिधापत्रिकेवरील केरोसिन वाटपाचे परिमाण वाढविणे, इत्यादी मागण्यांबाबतचे निवेदनअध्यक्ष, महाराष्ट्र केरोसिन हॉकर्स रिटेलर्स कामगार युनियन, नागपूर यांनी मा.मुख्यमंत्री व मा.अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचेकडे दिले आहे.
(३) सदर निवेदनातील मागण्या मान्य करता येत नसल्याबाबत निवेदनकर्त्यास शासनस्तरावरुन कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.